RNI No. MAHBIL/2012/44835
www.dgps.maharashtra.gov.in

सत्यमेव जयते

# महाराष्ट्र शासन राजपत्र

# भाग एक – नाशिक विभागीय पुरवणी

वर्ष - १५, अंक - ३ ] गुरुवार ते बुधवार, जानेवारी १५ - २१, २०२६ / पौष २५ ते माघ १, शके १९४७ [ पृष्ठे १५

## प्राधिकृत प्रकाशन

## शासकीय/संकीर्ण अधिसूचना, नेमणुका, पदोन्नती इत्यादी

### सदस्य सचिव, प्रस्ताव छाननी समिती तथा सहसंचालक, नगररचना यांजकडून

**अधिसूचना**

*महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगररचना अधिनियम, १९६६*

क्रमांक नावि/प्र.छा.स./प्रा.यो./कलम-२० *(४)*/गट नंबर ६२/१, ६२/२, ६३, ६४/प्लॉट/२८८/मौजे चांदशी, तालुका नाशिक/६९.०० मीटर प्रा.यो. रस्ता/१४/सन २०२५.— ज्याअर्थी, महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगररचना अधिनियम, १९६६ (यात यापुढे ज्यास “उक्त अधिनियम” असे संबोधले आहे) मधील तरतुदीनुसार नाशिक जिल्ह्याची सुधारित प्रादेशिक योजना (यात यापुढे ज्यास “उक्त प्रादेशिक योजना” असे संबोधले आहे) शासनाने दिनांक २१ जून २०१३ रोजी मंजूर केली असून, ती दिनांक १६ सप्टेंबर २०१३ पासून अंमलात आलेली आहे ;

आणि ज्याअर्थी, उक्त प्रादेशिक योजनेनुसार मौजे चांदशी व जलालपूर, तालुका व जिल्हा नाशिक यांचे सीमेवरील ६९.०० मीटर रुंद (४५ मीटर + दोन्ही बाजूचे सेवा रस्ते १२ मी.) प्रादेशिक योजना रस्त्याची रुंदी मुख्य अभियंता, सार्वजनिक बांधकाम, प्रादेशिक विभाग, नाशिक यांचे दिनांक ५ मार्च २०२० चे पत्र क्रमांक ८८५/२०२० नुसार ३० मीटर प्रस्तावित करणेबाबत अभिप्राय दिलेले आहेत ;

आणि ज्याअर्थी, राज्यात मंजूर असलेल्या प्रादेशिक योजनांमध्ये उक्त अधिनियमाचे कलम २० अन्वये वेळोवेळी कराव्या लागणाऱ्या जमीन वापराच्या फेरबदलासंदर्भाने करावयाच्या कार्यपद्धतीबाबत उक्त अधिनियमाचे कलम १५४ अन्वये शासन निर्णय क्रमांक टीपीएस-१८१५/प्र.क्र. ४९/१५/नवि-१३, दिनांक ६ मे २०१५ व दिनांक ४ जानेवारी २०१६ अन्वये शासनाने निर्देश दिलेले आहेत (यात यापुढे ज्यास “उक्त शासन निर्णय” असे संबोधले आहे) व त्या अनुषंगाने शासनाने “प्रस्ताव छाननी समिती” गठित केली आहे ;

आणि ज्याअर्थी, उक्त चांदशी व जलालपूर सीमेवरील ६९.०० मीटर रुंदीचा रस्ता, खालील अटींच्या अधीन राहून, ३०.०० मीटर रुंद करण्याचे प्रस्तावित असून, त्या अनुषंगाने उक्त प्रादेशिक योजना सुधारित करणे आवश्यक असल्याचे उक्त प्रस्ताव छाननी समितीचे मत झाले होते व यानुसार, उक्त अधिनियमाचे कलम २०, पोट-कलम *(२)* मधील तरतुदीनुसार, उक्त प्रादेशिक योजना सुधारित करणे आवश्यक होते (यात यापुढे ज्यास “प्रस्तावित फेरबदल” असे संबोधले आहे).

(१) शासन निर्णय दिनांक ४ जानेवारी २०१६ मध्ये नमूद तरतुदीनुसार संपूर्ण क्षेत्रासाठी अधिमूल्य रक्कम भरणे बंधनकारक राहील. तथापि, सदरची अधिमूल्य रक्कम तसेच प्रक्रिया शुल्क हे संबंधित जमीन मालकांकडून कलम २० *(४)* ची अधिसूचना निर्गमित करणेपूर्वी वसूल करणे आवश्यक राहील.

(२) सदर रस्ता आखणीतून मुक्त होणारे क्षेत्र लगतच्या वापर विभागात समाविष्ट होईल.

(३) विषयाधीन जागेचे विकसन करताना व विकासपश्चात तेथील पाणीपुरवठा, सांडपाणी व्यवस्था, घनकचरा विल्हेवाट/व्यवस्थापन यांकरिता योग्य ती स्वयंपूर्ण व्यवस्था अर्जदार यांनी करणे आवश्यक राहील.

(४) Rainwater Harvesting तसेच Water Recycling (पाण्याचा पुनर्वापर) व Solar Energy अशा स्वरूपाच्या संकल्पना सदर जमिनीचे विकसन करताना अंमलात आणण्यात याव्यात.

(५) भूजल खात्याने प्रस्तावित केलेल्या विहिरीसह अन्य पर्यायाद्वारे शुद्ध पाणी पुरेशा प्रमाणात विकसकाने उपलब्ध करणे बंधनकारक आहे.

आणि ज्याअर्थी, शासनाने उक्त अधिनियमाचे कलम १५१, पोट-कलम *(१)* अन्वये निर्णय क्रमांक टीपीएस-१८१५/प्र.क्र. ४९/१५/ नवि-१३, दिनांक ११ जून २०१५ नुसार कलम २०*(२)*, २०*(३)* व २०*(४)* खालील अधिकार विभागीय सहसंचालक, नगररचना यांना प्रदान केलेले आहेत;

आणि ज्याअर्थी, उक्त अधिनियमाच्या कलम २० चे पोट-कलम *(३)* च्या तरतुदीनुसार सहसंचालक, नगररचना, नाशिक विभाग, नाशिक यांचेकडील सूचना क्रमांक नावि/प्र.छा.स./प्रा.यो. नाशिक/कलम-२०*(३)*/ मौजे चांदशी व जलालपूर, तालुका नाशिक/ ६९.०० मीटर प्रा.यो. रस्ता/३८३, दिनांक २३ मार्च २०२० अन्वये उक्त प्रस्तावित फेरबदलाबाबत सर्व संबंधितांकडून विहित मुदतीत सूचना/हरकती दाखल करणाऱ्यांना सुनावणी देण्याकरिता व त्यावरील अहवाल सादर करण्यासाठी सहायक संचालक, नगररचना, नाशिक शाखा, नाशिक यांना प्राधिकृत करण्यात आले होते ;

आणि ज्याअर्थी, प्राधिकृत अधिकारी तथा सहायक संचालक, नगररचना, नाशिक यांनी वैधानिक कार्यवाही पूर्ण करून त्यांचा अहवाल सदस्य सचिव यांचेकडे सादर केला आहे. तसेच प्रस्ताव छाननी समितीच्या दिनांक २७ जुलै २०२० रोजीच्या बैठकीत अर्जदार यांनी अधिमूल्य रक्कम जमा केल्यानंतर कलम २०*(४)* ची अंतिम अधिसूचना निर्गमित करण्यास मान्यता देण्यात आली आहे ;

आणि ज्याअर्थी, मौजे चांदशी, तालुका व जिल्हा नाशिक येथील गट नंबर ६२/१, ६२/२, ६३, ६४/प्लॉट/२८८ मधील जमिनीतील प्रस्तुत सुमारे ४८९.०० चौरस मीटर फेरबदलाखालील क्षेत्र रस्ता सन्मुख असल्याने, त्यांचे क्षेत्रासाठी अधिनियमाचे कलम २०*(४)* अन्वये अधिसूचना निर्गमित करण्याची विनंती जमीन मालक जय पद्मावती बिल्डर्स तर्फे पार्टनर श्री. प्रसन्न विश्वनाथ कंकरेज व सोनाली प्रसन्न कंकरेज यांनी दिनांक १५ ऑक्टोबर २०२४ रोजीच्या पत्रान्वये केली आहे ;

आणि ज्याअर्थी, सहायक संचालक, नगररचना, नाशिक यांनी पत्र क्रमांक १८३३, दिनांक १७ ऑक्टोबर २०२५ अन्वये उपरोक्त संबंधित जमीन मालक यांनी प्रकरणी आवश्यक ते प्रक्रिया शुल्क व अधिमूल्य रक्कम शासकीय कोषागारात जमा केले असल्याचे या कार्यालयास कळविलेले आहे.

आता त्याअर्थी, याबाबतीत शासनाने प्रदान केलेल्या उक्त अधिकारानुसार उक्त अधिनियमाच्या कलम २०, पोट-कलम *(४)* अन्वये वर नमूद जमिनीच्या संबंधात, नाशिक शाखा कार्यालयाने भाग नकाशावर दर्शविलेल्या क्षेत्रामधील फेरबदलास खालीलप्रमाणे मंजुरी देत आहे व त्यासाठी उक्त प्रादेशिक योजना मंजुरीची दिनांक २१ जून २०१३ रोजीची अधिसूचना सुधारित करण्यात येत आहे.

उक्त प्रादेशिक योजना मंजुरीच्या अधिसूचनेसोबत जोडलेल्या फेरबदलाच्या अनुसूचीतील शेवटच्या नोंदीनंतर पुढील नव्या नोंदीचा समावेश करण्यात येत आहे.

**नोंद**

नाशिक जिल्ह्याच्या मंजूर सुधारित प्रादेशिक योजनेतील मौजे चांदशी व जलालपूर, तालुका व जिल्हा नाशिक यांचे सीमेवरील ६९.०० मीटर रुंद (४५ मीटर + दोन्ही बाजूचे सेवा रस्ते १२ मीटर) प्रादेशिक योजना रस्त्याची रुंदी ३०.०० मीटर इतकी सोबतच्या भाग नकाशात दर्शविल्यानुसार पुढील अटींच्या अधीन राहून करण्यात येत आहे.

**अटी :**

(१) सदर रस्ता आखणीतून मुक्त होणारे क्षेत्र लगतच्या वापर विभागात समाविष्ट होईल.

(२) विषयाधीन जागेचे विकसन करताना व विकासपश्चात तेथील पाणीपुरवठा, सांडपाणी व्यवस्था, घनकचरा विल्हेवाट/व्यवस्थापन यांकरिता योग्य ती स्वयंपूर्ण व्यवस्था अर्जदार यांनी करणे आवश्यक राहील.

(३) Rainwater Harvesting तसेच Water Recycling (पाण्याचा पुनर्वापर) व Solar Energy अशा स्वरूपाच्या संकल्पना सदर जमिनीचे विकसन करताना अंमलात आणण्यात याव्यात.

(४) शुद्ध पाणी पुरेशा प्रमाणात विकसकाने उपलब्ध करणे बंधनकारक आहे.

वरीलबाबत उल्लंघन झाल्यास रेखांकन मंजुरी व अकृषिक परवानगी रद्द करण्यास पात्र राहील.

उक्त मंजूर फेरबदल दर्शविणारा नकाशा नागरिकांच्या अवलोकनार्थ खालील कार्यालयात कामकाजाच्या दिवशी कार्यालयीन वेळेत उपलब्ध राहील.

१) जिल्हाधिकारी, नाशिक.

२) सहायक संचालक, नगररचना, नाशिक शाखा, नाशिक.

प्रस्तुत सूचना **www.dtp.maharashtra.gov.in** या संकेतस्थळावर उपलब्ध आहे.

**आकाश बागुल,**
सदस्य सचिव,
प्रस्ताव छाननी समिती तथा
सहसंचालक, नगररचना,
नाशिक विभाग, नाशिक.

नाशिक, २ जानेवारी २०२६.

---

## BY MEMBER SECRETARY, PROPOSAL SCRUTINY COMMITTEE AND JOINT DIRECTOR OF TOWN PLANNING

### Notification

*The Maharashtra Regional Planning and Town Planning Act, 1966*

No. NKDN/P.S.C./R.P. Nashik/Sect.20 *(4)*/ Gat Nos. 62/1, 62/2, 63, 64/Plot/288/mouje Chandshi, taluka Nashik/69.00 mtrs. R.P. Road/ 14/2025.– Whereas, the Government has sanctioned the Revised Regional Plan for Nashik District on dated 21st June 2013 (hereinafter referred to as “the said Regional Plan”) under the provisions of the Maharashtra Regional Planning and Town Planning Act, 1966 (hereinafter referred to as “the said Act”) and the same has came into force with effect from 16th September 2013 ;

and whereas, Chief Engineer, Public Works Department, Regional Office, Nashik *vide* Letter No. 885/2020, dated 5th March 2020 has given the recommendation to reduce the width of 69.00 mtrs. wide (45+12+12) Regional Plan road along the boundary of Mouje Chandshi and Jalalpur, taluka and district Nashik to 30.00 mtrs ;

and whereas, the Government *vide* Resolution No. TPS-1815/C.R. 49/15/UD-13, Dated 6th May 2015 and Dated 4th January 2016 (hereinafter referred to as “the said Government Resolution”) has issued the directives under Section 154 of the said Act, regarding the procedure to be followed under Section 20 of the said Act, for making changes in the use of land in the areas of sanctioned Regional Plans, and for that purpose constituted “Proposal Scrutiny Committee” ;

and whereas, the “Proposal Scrutiny Committee” constituted under the said Government Resolution, is of the opinion that, the said 69.00 mtrs. wide Regional Plan road is proposed to be 30.00 mtrs. wide and the land so released from the road alignment shall be included in the adjacent land use zone, in accordance with the provisions of sub-section *(2)* of Section 20 of the said Act, subject to the following conditions (hereinafter referred to as “the proposed Modification”) :-

(1) It shall be binding to deposit the premium amount as mentioned in Government Resolution dated 4th January 2016. The premium and Scrutiny fee shall be collected from the concerned land owners before issue of Notification under Section 20*(4)* of the said Act.

(2) The land so released from the road alignment shall be included in the adjacent land use zone.

(3) Applicant/Developer shall make necessary self contained arrangements to provide Water Supply, Waste Water Treatment, Solid Waste Disposal/Management while developing the said Land and after development of the said Land at his own cost.

(4) It shall be necessary to develop the concept like Rainwater Harvesting, Water Recycling and Solar Energy while developing the said Land.

(5) It is binding on the land developer to make available the pure water.

and whereas, as per the provision of sub-section *(1)* of Section 151 of the said Act, Government *vide* Notification No.TPS-1815/CR-49/15/UD-13, dated 11th June 2015 has delegated the powers under Sections 20*(2)*, 20*(3)* and 20*(4)* of the said Act to the concerned Joint Director of Town Planning;

and whereas, in accordance with the provisions of sub-section *(3)* of Section 20 of the said Act, Joint Director of Town Planning, Nashik Division, Nashik *vide* Notice No. NKDN/P.S.C./R.P. Nashik/Sect.20*(3)*/ Mouje Chandshi and Jalalpur, Taluka Nashik/69.00 mtrs. R.P. Road/ 383, Dated 23rd March 2020 has published, the notice regarding the proposed modification and Assistant Director of Town Planning, Nashik Branch, Nashik was Appointed to hear the suggestions/objections received within the stipulated period;

and whereas, the Appointed officer *i.e.* Assistant Director of Town Planning, Nashik Branch has submitted his report to the Member Secretary, also the Proposal Scrutiny Committee, in the meeting dated, 27th July 2020 accorded approval to this proposal and directed Member Secretary to issue the final Notification according to sub-section *(4)* of Section 20, after payment of the premium by the Applicant;

and whereas, the land bearing Gat Nos. 62/1, 62/2, 63, 64/Plot/288 of Mouje Chandshi, taluka and district Nashik area admeasuring about 489.00 sq. mtrs. is fronting on the said Road under modification and the owner of said Land Mr. Prasanna Vishwanath Kankrej and Mrs. Sonal Prasanna Kanrej on behalf of Jay Padmavati Builders *vide* his latter dated 15th October 2024 has requested to issue the Notification under Section 20 *(4)*;

and whereas, the Assistant Director of Town Planning, Nashik Branch, Nashik *vide* his letter No. 1833, dated 17th October 2025 informed this office that, the concerned owner has submitted the required scrutiny fee and premium amount in the Government Treasury.

Now, therefore, in exercise of powers conferred by sub-section *(4)* of Section 20 of the said Act, Joint Director of Town Planning, Nashik Division, Nashik hereby sanctions the said Modification for the land shown by the Nashik Branch Office on the Part Plan and for that purpose amends the aforesaid Notification dated, 21st June 2013, as follows.

In the said Regional Plan, the following new entry shall be added after the last entry of the Schedule of Modifications.

**ENTRY**

In the sanctioned Revised Regional Plan of Nashik District the 69.00 mtrs. wide Regional Plan Road shown on the boundary of Chandshi and Jalalpur, taluka and district Nashik is reduced to be 30.00 mtrs. wide and the land so released from the road alignment shall be included in the adjacent land use zone as shown on the Part Plan, subject to the following conditions.

**Conditions :-**

(1) The land so released from the road alignment shall be included in the adjacent land use zone.

(2) Applicant/Developer shall make necessary self contained arrangements to provide Water Supply, Waste Water Treatment, Solid Waste Disposal/Management while developing the said Land and after development of the said Land at his own cost.

(3) It shall be necessary to develop the concept like Rainwater Harvesting, Water Recycling and Solar Energy while developing the said Land.

(4) It is binding on the land developer to make available the pure water.

In case of Non-Compliance, Layout Approval and Non-Agricultural permission shall liable to be cancelled.

The Part Plan showing the above said sanctioned Modification shall be kept open for information of general public during office hours on all working days at the following offices:-

1) The Collector, Nashik.

2) The Assistant Director of Town Planning, Nashik Branch, Nashik.

This Notice is also be available on website **www.dtp.maharashtra.gov.in.**

**AAKASH BAGUL,**
Member Secretary,
Proposal Scrutiny Committee and
Joint Director of Town Planning,
Nashik Division, Nashik.

Nashik, 2nd January 2026.

---

## जिल्हाधिकारी तथा समुचित शासन यांजकडून

*न्याय्य नुकसानभरपाई मिळण्याचा आणि भूमी संपादन, पुनर्वसन व पुनर्वसाहत यामध्ये पारदर्शकता राखण्याचा हक्क अधिनियम, २०१३ चे कलम १९ अन्वये*

**अधिसूचना**

**प्रकल्पाचे नाव- निम्न तापी प्रकल्प, पाडळसे (मौजे मठगव्हाण, तालुका अमळनेर), तालुका अमळनेर, जिल्हा जळगाव**

**जिल्हा जळगाव**

क्रमांक भूसंपादन प्रस्ताव / एसआर-७८ / २०२० / सन २०२५.-– ज्याअर्थी, समुचित शासन असलेल्या जळगाव जिल्ह्याच्या जिल्हाधिकाऱ्यांनी भूमी संपादन, पुनर्वसन व पुनर्वसाहत करताना उचित भरपाई मिळण्याचा आणि पारदर्शकतेचा हक्क अधिनियम, २०१३ (२०१३ चा ३०) (यात यापुढे ज्याचा निर्देश “उक्त अधिनियम” असा केला आहे) याच्या कलम ११ च्या पोट-कलम *(१)* द्वारे प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांचा वापर करून, अधिसूचना क्रमांक भूसंपादन/एसआर-७८/२०२०, दिनांक १ फेब्रुवारी २०२४ अन्वये प्रारंभिक अधिसूचना काढली आहे आणि त्याद्वारे असे अधिसूचित केले आहे की, यासोबत जोडलेल्या अनुसूची “एक” मध्ये अधिक तपशीलवार वर्णन केलेल्या जमिनींची, अनुसूची “दोन” मध्ये अधिक तपशीलवार विनिर्दिष्ट केलेल्या सार्वजनिक प्रयोजनासाठी आवश्यकता आहे किंवा त्यांची आवश्यकता भासण्याची शक्यता आहे ;

आणि ज्याअर्थी, जळगाव जिल्ह्याच्या जिल्हाधिकाऱ्यांनी, कलम १५ च्या पोट-कलम *(२)* अन्वये दिलेला अहवाल कोणताही असल्यास, विचारात घेतल्यानंतर, उक्त सार्वजनिक प्रयोजनासाठी उक्त जमिनी संपादित करण्याची आवश्यकता आहे, याबाबत त्यांची खात्री पटली आहे आणि म्हणून उक्त अधिनियमाच्या कलम १९ च्या पोट-कलम *(१)* च्या तरतुदीन्वये उक्त सार्वजनिक प्रयोजनासाठी उक्त जमिनींची आवश्यकता आहे, असे याद्वारे घोषित करण्यात येत आहे ;

आणि ज्याअर्थी, अनुसूची “तीन” मध्ये अधिक तपशीलवार वर्णन केलेले क्षेत्र हे बाधित कुटुंबीयांच्या पुनर्वसन व पुनर्वसाहतीच्या प्रयोजनासाठी “पुनर्वसाहत क्षेत्र” म्हणून निर्धारित केले असल्याचे याद्वारे घोषित केले जात असून, पुनर्वसन व पुनर्वसाहत योजनेचा सारांश अनुसूची “चार” मध्ये विनिर्दिष्ट केला आहे ;

आणि ज्याअर्थी, उक्त अधिनियमाच्या कलम ३ च्या खंड *(छ)* अन्वये, समुचित शासन असलेले जिल्हाधिकारी हे उक्त अधिनियमान्वये जिल्हाधिकाऱ्यांची कार्ये पार पाडण्यासाठी उपविभागीय अधिकारी, अमळनेर भाग, अमळनेर, तालुका अमळनेर, जिल्हा जळगाव यांना पदनिर्देशित करीत आहेत.

**अनुसूची - १**

**जमिनींचे वर्णन**

**जिल्हा जळगाव, तालुका अमळनेर, गाव मठगव्हाण**

**भूसंपादन होणाऱ्या जमिनींचे शिवार : मठगव्हाण**

| गट क्रमांक | | संपादित होणारे अंदाजे क्षेत्र |
|---|---|---|
| १ | | २ |
| | | हे. आर |
| १७५ | .. | ० ०१० |
| १७६ | .. | ० १०० |
| १८२ | .. | ० १३० |
| १८३ | .. | ० ०७० |
| १८४ | .. | ० ०६० |
| १८५ | .. | ० ०५० |
| १८६ | .. | ० ३५० |
| १८७ | .. | ० १०० |
| १८८ | .. | ० ०८० |

**अनुसूची - दोन**

**सार्वजनिक प्रयोजनाच्या स्वरूपाबाबत विवरण**

**प्रकल्पाचे नाव :** निम्न तापी प्रकल्प, पाडळसे, तालुका अमळनेर, जिल्हा जळगाव.

**प्रकल्प कार्याचे वर्णन :** मौजे मठगव्हाण, तालुका अमळनेर, जिल्हा जळगाव येथील निम्न तापी प्रकल्पाच्या बुडीत क्षेत्रात येणाऱ्या भूसंपादनाबाबत.

**समाजाला मिळणारे लाभ :** या प्रकल्पामुळे मौजे मठगव्हाण, तालुका अमळनेर, जिल्हा जळगाव येथील भूसंपादन होऊन निम्न तापी प्रकल्प, पाडळसे, तालुका अमळनेर अंतर्गत येणाऱ्या पाडळसे प्रकल्प कामास गती येईल.

**अनुसूची - तीन**

**बाधित व्यक्तींचे विस्थापन करण्यास भाग पाडणारी कारणे**

सदर संपादित क्षेत्र हे शेतजमिनींचे असल्यामुळे बाधित व्यक्तींचे विस्थापन होत नाही व पुनर्वसन करण्याचा प्रश्नच उद्‌भवत नाही.

**अनुसूची - चार**

**सामाजिक परिणाम निर्धारण सारांश**

भूमी संपादन, पुनर्वसन व पुर्नवसाहत करताना उचित भरपाई मिळण्याचा आणि पारदर्शकतेचा हक्क अधिनियम, २०१३ चे कलम ६ *(२)* च्या परंतुकाअन्वये ज्या प्रकल्पांना पर्यावरण परिणाम निर्धारण अहवाल त्या त्या वेळी अस्तित्वात असलेल्या कोणत्याही कायद्यान्वये आवश्यक असेल, अशा प्रकल्पासाठी या अधिनियमान्वये विहित सामाजिक परिणाम निर्धारण अहवालाच्या तरतुदी लागू होणार नाहीत.

त्यानुसार सदर प्रकल्पास दिनांक २५ मार्च २०१५ रोजी पर्यावरण, वन व हवामान बदल विभाग, भारत सरकार, नवी दिल्ली यांचेकडील इंग्रजी पत्र क्रमांक J-1/2011/42/2009-IA-I अन्वये पर्यावरणविषयक परवानगी प्राप्त आहे. त्यामुळे सदर प्रकल्पासाठी सामाजिक परिणाम निर्धारण अहवाल सादर करण्याची आवश्यकता नाही.

**अनुसूची - पाच**

**नियुक्त केलेल्या प्रशासकाचा तपशील**

**(अ)** सदर क्षेत्र हे शेतजमिनीचे असल्यामुळे पुनर्वसन करण्याची आवश्यकता नाही. सबब प्रशासक नियुक्ती प्रश्न उद्‌भवत नाही.

**(ब)** प्रशासनाच्या कार्यालयाचा पत्ता : निरंक.

**(क)** ज्या अधिसूचनेद्वारे प्रशासकाची नियुक्ती करण्यात आली आहे त्या अधिसूचनेचा तपशील : निरंक.

**रोहन घुगे** (भा.प्र.से.),
जिल्हाधिकारी तथा
समुचित शासन, जळगाव.

जळगाव, २९ डिसेंबर २०२५.

---

*न्याय्य नुकसानभरपाई मिळण्याचा आणि भूमी संपादन, पुनर्वसन व पुनर्वसाहत यामध्ये पारदर्शकता राखण्याचा हक्क अधिनियम, २०१३ चे कलम १९ अन्वये*

**अधिसूचना**

**प्रकल्पाचे नाव- निम्न तापी प्रकल्प, पाडळसे**
**(मौजे खापरखेडा प्र.ज., तालुका अमळनेर),**
**तालुका अमळनेर, जिल्हा जळगाव**

**जिल्हा जळगाव**

क्रमांक भूसंपादन प्रस्ताव / एसआर-७९ / २०२० / सन २०२५.-– ज्याअर्थी, समुचित शासन असलेल्या जळगाव जिल्ह्याच्या जिल्हाधिकाऱ्यांनी भूमी संपादन, पुनर्वसन व पुनर्वसाहत करताना उचित भरपाई मिळण्याचा आणि पारदर्शकतेचा हक्क अधिनियम, २०१३ (२०१३ चा ३०) (यात यापुढे ज्याचा निर्देश “उक्त अधिनियम” असा केला आहे) याच्या कलम ११ च्या पोट-कलम *(१)* द्वारे प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांचा वापर करून, अधिसूचना क्रमांक भूसंपादन/एसआर-७९/२०२०, दिनांक १ फेब्रुवारी २०२४ अन्वये प्रारंभिक अधिसूचना काढली आहे आणि त्याद्वारे असे अधिसूचित केले आहे की, यासोबत जोडलेल्या अनुसूची “एक” मध्ये अधिक

तपशीलवार वर्णन केलेल्या जमिनींची, अनुसूची "दोन" मध्ये अधिक तपशीलवार विनिर्दिष्ट केलेल्या सार्वजनिक प्रयोजनासाठी आवश्यकता आहे किंवा त्यांची आवश्यकता भासण्याची शक्यता आहे ;

आणि ज्याअर्थी, जळगाव जिल्ह्याच्या जिल्हाधिकाऱ्यांनी, कलम १५ च्या पोट-कलम *(२)* अन्वये दिलेला अहवाल कोणताही असल्यास, विचारात घेतल्यानंतर, उक्त सार्वजनिक प्रयोजनासाठी उक्त जमिनी संपादित करण्याची आवश्यकता आहे, याबाबत त्यांची खात्री पटली आहे आणि म्हणून उक्त अधिनियमाच्या कलम १९ च्या पोट-कलम *(१)* च्या तरतुदीन्वये उक्त सार्वजनिक प्रयोजनासाठी उक्त जमिनींची आवश्यकता आहे, असे याद्वारे घोषित करण्यात येत आहे ;

आणि ज्याअर्थी, अनुसूची "तीन" मध्ये अधिक तपशीलवार वर्णन केलेले क्षेत्र हे बाधित कुटुंबीयांच्या पुनर्वसन व पुनर्वसाहतीच्या प्रयोजनासाठी "पुनर्वसाहत क्षेत्र" म्हणून निर्धारित केले असल्याचे याद्वारे घोषित केले जात असून, पुनर्वसन व पुनर्वसाहत योजनेचा सारांश अनुसूची "चार" मध्ये विनिर्दिष्ट केला आहे ;

आणि ज्याअर्थी, उक्त अधिनियमाच्या कलम ३ च्या खंड *(छ)* अन्वये, समुचित शासन असलेले जिल्हाधिकारी हे उक्त अधिनियमान्वये जिल्हाधिकाऱ्यांची कार्ये पार पाडण्यासाठी उपविभागीय अधिकारी, अमळनेर भाग, अमळनेर, तालुका अमळनेर, जिल्हा जळगाव यांना पदनिर्देशित करीत आहेत.

**अनुसूची - १**

**जमिनींचे वर्णन**

**जिल्हा जळगाव, तालुका अमळनेर, गाव खापरखेडा प्र.ज.**

**भूसंपादन होणाऱ्या जमिनींचे शिवार : खापरखेडा प्र.ज.**

| गट क्रमांक | | संपादित होणारे अंदाजे क्षेत्र | |
|---|---|---|---|
| १ | | २ | |
| | | हे. | आर |
| २ | .. | ० | २००० |
| ३ | .. | ० | ३५०० |
| ४/१ | .. | ० | ०१ |
| ४/२ | | | |
| ६६ | .. | ० | २००० |
| ६७ | .. | ० | ६००० |
| ६८ | .. | ० | ४००० |
| ६९ | .. | १ | ३००० |
| ७०/१ | .. | ० | १९ |

**अनुसूची - १ —** *चालू*

| गट क्रमांक | | संपादित होणारे एकूण क्षेत्र | |
|---|---|---|---|
| १ | | २ | |
| | | हे. | आर |
| ७०/२ | | | |
| ७१ | .. | ० | १५०० |
| ७२ | .. | ० | ८१०० |
| ७३ | .. | ० | ४००० |
| ७६ | .. | ० | ८१०० |
| ७७ | .. | ० | ८९०० |
| ७८ | .. | ० | २५०० |
| ८१/१ | .. | ० | १९ |
| ८१/२ | | | |
| ८१/३ | | | |

**अनुसूची - दोन**

**सार्वजनिक प्रयोजनाच्या स्वरूपाबाबत विवरण**

**प्रकल्पाचे नाव :** निम्न तापी प्रकल्प, पाडळसे, तालुका अमळनेर, जिल्हा जळगाव.

**प्रकल्प कार्याचे वर्णन :** मौजे खापरखेडा प्र.ज., तालुका अमळनेर, जिल्हा जळगाव येथील निम्न तापी प्रकल्पाच्या बुडीत क्षेत्रात येणाऱ्या भूसंपादनाबाबत.

**समाजाला मिळणारे लाभ :** या प्रकल्पामुळे मौजे खापरखेडा प्र.ज., तालुका अमळनेर, जिल्हा जळगाव येथील भूसंपादन होऊन निम्न तापी प्रकल्प, पाडळसे, तालुका अमळनेर अंतर्गत येणाऱ्या पाडळसे प्रकल्प कामास गती येईल.

**अनुसूची - तीन**

**बाधित व्यक्तींचे विस्थापन करण्यास भाग पाडणारी कारणे**

सदर संपादित क्षेत्र हे शेतजमिनींचे असल्यामुळे बाधित व्यक्तींचे विस्थापन होत नाही व पुनर्वसन करण्याचा प्रश्नच उद्‌भवत नाही.

**अनुसूची - चार**

**सामाजिक परिणाम निर्धारण सारांश**

भूमी संपादन, पुनर्वसन व पुर्नवसाहत करताना उचित भरपाई मिळण्याचा आणि पारदर्शकतेचा हक्क अधिनियम, २०१३ चे कलम ६ *(२)* च्या परंतुकाअन्वये ज्या प्रकल्पांना पर्यावरण परिणाम निर्धारण अहवाल त्या त्या वेळी अस्तित्वात असलेल्या

कोणत्याही कायद्यान्वये आवश्यक असेल, अशा प्रकल्पासाठी या अधिनियमान्वये विहित सामाजिक परिणाम निर्धारण अहवालाच्या तरतुदी लागू होणार नाहीत.

त्यानुसार सदर प्रकल्पास दिनांक २५ मार्च २०१५ रोजी पर्यावरण, वन व हवामान बदल विभाग, भारत सरकार, नवी दिल्ली यांचेकडील इंग्रजी पत्र क्रमांक J-1/2011/42/2009-IA-I अन्वये पर्यावरणविषयक परवानगी प्राप्त आहे. त्यामुळे सदर प्रकल्पासाठी सामाजिक परिणाम निर्धारण अहवाल सादर करण्याची आवश्यकता नाही.

**अनुसूची - पाच**

**नियुक्त केलेल्या प्रशासकाचा तपशील**

**(अ)** सदर क्षेत्र हे शेतजमिनीचे असल्यामुळे पुनर्वसन करण्याची आवश्यकता नाही. सबब प्रशासक नियुक्ती प्रश्न उद्‌भवत नाही.

**(ब)** प्रशासनाच्या कार्यालयाचा पत्ता : निरंक.

**(क)** ज्या अधिसूचनेद्वारे प्रशासकाची नियुक्ती करण्यात आली आहे त्या अधिसूचनेचा तपशील : निरंक.

**रोहन घुगे** (भा.प्र.से.),
जिल्हाधिकारी तथा
समुचित शासन, जळगाव.

जळगाव, २९ डिसेंबर २०२५.

---

*न्याय्य नुकसानभरपाई मिळण्याचा आणि भूमी संपादन, पुनर्वसन व पुनर्वसाहत यामध्ये पारदर्शकता राखण्याचा हक्क अधिनियम, २०१३ चे कलम १९ अन्वये*

**अधिसूचना**

**प्रकल्पाचे नाव- निम्न तापी प्रकल्प, पाडळसे (मौजे मुंगसे, तालुका अमळनेर), तालुका अमळनेर, जिल्हा जळगाव**

**जिल्हा जळगाव**

क्रमांक भूसंपादन प्रस्ताव / एसआर-९२ / २०२० / सन २०२५.-– ज्याअर्थी, समुचित शासन असलेल्या जळगाव जिल्ह्याच्या जिल्हाधिकाऱ्यांनी भूमी संपादन, पुनर्वसन व पुनर्वसाहत करताना उचित भरपाई मिळण्याचा आणि पारदर्शकतेचा हक्क अधिनियम, २०१३ (२०१३ चा ३०) (यात यापुढे ज्याचा निर्देश "उक्त अधिनियम" असा केला आहे) याच्या कलम ११ च्या पोट-कलम *(१)* द्वारे प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांचा वापर करून, अधिसूचना क्रमांक भूसंपादन/एसआर-९२/२०२०, दिनांक १ फेब्रुवारी २०२४ अन्वये प्रारंभिक अधिसूचना काढली आहे आणि त्याद्वारे असे अधिसूचित केले आहे की, यासोबत जोडलेल्या अनुसूची "एक" मध्ये अधिक तपशीलवार वर्णन केलेल्या जमिनींची, अनुसूची "दोन" मध्ये अधिक तपशीलवार विनिर्दिष्ट केलेल्या सार्वजनिक प्रयोजनासाठी आवश्यकता आहे किंवा त्यांची आवश्यकता भासण्याची शक्यता आहे ;

आणि ज्याअर्थी, जळगाव जिल्ह्याच्या जिल्हाधिकाऱ्यांनी, कलम १५ च्या पोट-कलम *(२)* अन्वये दिलेला अहवाल कोणताही असल्यास, विचारात घेतल्यानंतर, उक्त सार्वजनिक प्रयोजनासाठी उक्त जमिनी संपादित करण्याची आवश्यकता आहे, याबाबत त्यांची खात्री पटली आहे आणि म्हणून उक्त अधिनियमाच्या कलम १९ च्या पोट-कलम *(१)* च्या तरतुदींन्वये उक्त सार्वजनिक प्रयोजनासाठी उक्त जमिनींची आवश्यकता आहे, असे याद्वारे घोषित करण्यात येत आहे ;

आणि ज्याअर्थी, अनुसूची "तीन" मध्ये अधिक तपशीलवार वर्णन केलेले क्षेत्र हे बाधित कुटुंबीयांच्या पुनर्वसन व पुनर्वसाहतीच्या प्रयोजनासाठी "पुनर्वसाहत क्षेत्र" म्हणून निर्धारित केले असल्याचे याद्वारे घोषित केले जात असून, पुनर्वसन व पुनर्वसाहत योजनेचा सारांश अनुसूची "चार" मध्ये विनिर्दिष्ट केला आहे ;

आणि ज्याअर्थी, उक्त अधिनियमाच्या कलम ३ च्या खंड *(छ)* अन्वये, समुचित शासन असलेले जिल्हाधिकारी हे उक्त अधिनियमान्वये जिल्हाधिकाऱ्यांची कार्ये पार पाडण्यासाठी उपविभागीय अधिकारी, अमळनेर भाग, अमळनेर, तालुका अमळनेर, जिल्हा जळगाव यांना पदनिर्देशित करीत आहेत.

**अनुसूची - १**

**जमिनींचे वर्णन**

**जिल्हा जळगाव, तालुका अमळनेर, गाव मुंगसे**

**भूसंपादन होणाऱ्या जमिनींचे शिवार : मुंगसे**

| गट क्रमांक | | संपादित होणारे एकूण क्षेत्र |
|---|---|---|
| १ | | २ |
| | | हे. आर |
| २ | .. | ० ०२ |
| ७ | .. | ० ०१ |
| ९ | .. | ० १७ |
| १० | .. | ० ०२ |
| ११ | .. | ० ०२ |

**अनुसूची - दोन**

**सार्वजनिक प्रयोजनाच्या स्वरूपाबाबत विवरण**

**प्रकल्पाचे नाव :** निम्न तापी प्रकल्प, पाडळसे, तालुका अमळनेर, जिल्हा जळगाव.

**प्रकल्प कार्याचे वर्णन :** मौजे मुंगसे, तालुका अमळनेर, जिल्हा जळगाव येथील निम्न तापी प्रकल्पाच्या बुडीत क्षेत्रात येणाऱ्या भूसंपादनाबाबत.

**समाजाला मिळणारे लाभ :** या प्रकल्पामुळे मौजे मुंगसे, तालुका अमळनेर, जिल्हा जळगाव येथील भूसंपादन होऊन निम्न तापी प्रकल्प, पाडळसे, तालुका अमळनेर अंतर्गत येणाऱ्या पाडळसे प्रकल्प कामास गती येईल.

**अनुसूची - तीन**

**बाधित व्यक्तींचे विस्थापन करण्यास भाग पाडणारी कारणे**

सदर संपादित क्षेत्र हे शेतजमिनींचे असल्यामुळे बाधित व्यक्तीचे विस्थापन होत नाही व पुनर्वसन करण्याचा प्रश्नच उद्‌भवत नाही.

**अनुसूची - चार**

**सामाजिक प्रभाव निर्धारणाचा सारांश**

भूमी संपादन, पुनर्वसन व पुर्नवसाहत करताना उचित भरपाई मिळण्याचा आणि पारदर्शकतेचा हक्क अधिनियम, २०१३ चे कलम ६ *(२)* च्या परंतुकाअन्वये ज्या प्रकल्पांना पर्यावरण परिणाम निर्धारण अहवाल त्या त्या वेळी अस्तित्वात असलेल्या कोणत्याही कायद्यान्वये आवश्यक असेल, अशा प्रकल्पासाठी या अधिनियमान्वये विहित सामाजिक परिणाम निर्धारण अहवालाच्या तरतुदी लागू होणार नाहीत.

त्यानुसार सदर प्रकल्पास दिनांक २५ मार्च २०१५ रोजी पर्यावरण, वन व हवामान बदल विभाग, भारत सरकार, नवी दिल्ली यांचेकडील इंग्रजी पत्र क्रमांक J-1/2011/42/2009-IA-I अन्वये पर्यावरणविषयक परवानगी प्राप्त आहे. त्यामुळे सदर प्रकल्पासाठी सामाजिक परिणाम निर्धारण अहवाल सादर करण्याची आवश्यकता नाही.

**अनुसूची - पाच**

**नियुक्त केलेल्या प्रशासकाचा तपशील**

**(अ)** सदर क्षेत्र हे शेतजमिनीचे असल्यामुळे पुनर्वसन करण्याची आवश्यकता नाही. सबब प्रशासक नियुक्ती प्रश्न उद्‌भवत नाही.

**(ब)** प्रशासनाच्या कार्यालयाचा पत्ता : निरंक.

**(क)** ज्या अधिसूचनेद्वारे प्रशासकाची नियुक्ती करण्यात आली आहे त्या अधिसूचनेचा तपशील : निरंक.

**रोहन घुगे** (भा.प्र.से.),
जिल्हाधिकारी तथा
समुचित शासन, जळगाव.

जळगाव, २९ डिसेंबर २०२५.

---

*भूमी संपादन, पुनर्वसन व पुनर्वसाहत करताना उचित भरपाई मिळण्याचा आणि पारदर्शकतेचा हक्क अधिनियम, २०१३ अंतर्गत कलम १९ अन्वये*

**अधिसूचना**

**भूसं.प्र.क्र.०२/२०२३ नंदुरबार जिल्ह्याचे पोलीस दलाचे आस्थापनेवरील पोलीस परेड ग्राऊंडसाठी पोलीस विभागाच्या नावावर आरक्षित जागा उपनगर पोलीस स्टेशनकरिता मौजे नंदुरबार, तालुका-जिल्हा नंदुरबार येथील खाजगी जमीन संपादन**

**जिल्हा नंदुरबार**

क्रमांक भूसंपादन/कावि-११९१/२०२५.— ज्याअर्थी, उपविभागीय अधिकारी, नंदुरबार भाग, नंदुरबार यांनी खालील अनुसूची-१ मध्ये नमूद केलेल्या जमिनी भूमी संपादन, पुनर्वसन व पुनर्वसाहत करताना भरपाई मिळण्याचा व पारदर्शकतेचा हक्क अधिनियम, २०१३ चे कलम ११ अन्वये, मौजे नंदुरबार, तालुका नंदुरबार येथील नंदुरबार जिल्ह्याचे पोलीस दलाचे आस्थापनेवरील पोलीस परेड ग्राऊंडसाठी पोलीस विभागाच्या नावावर आरक्षित जागा उपनगर पोलीस स्टेशनकरिता या सार्वजनिक प्रयोजनासाठी आवश्यक असल्याची किंवा आवश्यक असण्याची शक्यता असल्याबाबतची प्राथमिक अधिसूचना दिनांक २९ नोव्हेंबर २०२३ रोजी प्रसिद्ध केली आहे;

आणि, ज्याअर्थी, उपविभागीय अधिकारी, नंदुरबार भाग, नंदुरबार यांनी प्रसिद्ध केलेल्या सदर प्राथमिक अधिसूचनेवर आजतागायत एकही हरकत प्राप्त झालेली नाही;

आणि, उक्त सार्वजनिक प्रयोजनासाठी उक्त जमिनी संपादित करण्याची आवश्यकता आहे याबाबत समुचित शासन तथा जिल्हाधिकारी, नंदुरबार यांची अशी खात्री झाली आहे. त्यामुळे उक्त अधिनियमाच्या कलम १९ चे पोट-कलम *(१)* च्या तरतुदींन्वये सार्वजनिक प्रयोजनासाठी उक्त जमिनींची आवश्यकता आहे, असे याद्वारे घोषित करण्यात येत आहे;

आणि ज्याअर्थी, अनुसूची-३ मध्ये अधिक तपशीलवार वर्णन केलेल क्षेत्र हे कुटुंबीयांच्या पुनर्वसन व पुनर्वसाहतीच्या प्रयोजनासाठी पुनर्वसन क्षेत्र म्हणून निधारित केले असल्याचे याद्वारे घोषित केले जात असून, पुनर्वसन योजनेचा सारांश अनुसूची-४ मध्ये विनिर्दिष्ट केला आहे.

आणि ज्याअर्थी, उक्त अधिनियमाच्या कलम ३ च्या खंड *(ग)* अन्वये समुचित शासन असलेले जिल्हाधिकारी उक्त अधिनियमान्वये जिल्हाधिकाऱ्यांची कार्ये पार पाडण्यासाठी उपविभागीय अधिकारी, नंदुरबार भाग, नंदुरबार यांना पदनिर्देशित करीत आहेत.

सदर जमिनींचे नकाशे व अन्य अभिलेख कार्यालयीन वेळेत उपविभागीय अधिकारी, नंदुरबार भाग, नंदुरबार यांच्या कार्यालयात पाहणीसाठी उपलब्ध राहतील.

**अनुसूची - १**

**जमिनींचे वर्णन**

**जिल्हा नंदुरबार, तालुका नंदुरबार, मौजे नंदुरबार**

**नंदुरबार जिल्ह्याचे पोलीस दलाचे आस्थापनेवरील पोलीस परेड ग्राऊंडसाठी पोलीस विभागाच्या नावावर आरक्षित जागा उपनगर पोलीस स्टेशनकरिता मौजे नंदुरबार, तालुका-जिल्हा नंदुरबार येथील खाजगी जमीन**

| गट नंबर | | संपादित करावयाचे क्षेत्र |
|---|---|---|
| १ | | २ |
| | | चौ. मी. |
| ९/३ | .. | ७१०० |
| ९/४ | .. | २००० |
| ९/५ | .. | ८१०० |
| **एकूण** | .. | **१७२००** |

**अनुसूची- २**

**सार्वजनिक प्रयोजनाच्या स्वरूपाबाबत विवरण**

**प्रकल्पाचे नाव :** नंदुरबार जिल्ह्याचे पोलीस दलाचे आस्थापनेवरील पोलीस परेड ग्राऊंडसाठी पोलीस विभागाच्या नावावर आरक्षित जागा उपनगर पोलीस स्टेशनकरिता मौजे नंदुरबार, तालुका-जिल्हा नंदुरबार.

**प्रकल्पाचे प्रयोजन :** मौजे नंदुरबार, तालुका-जिल्हा नंदुरबार येथील जमिनीचे भूसंपादन करणे.

**समाजाला मिळणारे लाभ :** नंदुरबार शहरासाठी पोलीस स्टेशन

**अनुसूची - ३**

विस्थापन नाही

**अनुसूची - ४**

प्रस्तावित भूसंपादित जागा ही नंदुरबार जिल्हा पोलीस दलाचे आस्थापनेवरील पोलीस परेड ग्राऊंडसाठी पोलीस विभागाच्या नावावर आरक्षित आहे. सन २०१८ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ३७, दिनांक २६ एप्रिल २०१८ अन्वये पायाभूत सुविधा प्रकल्प, ज्यात जमिनीची मालकी राज्य शासनाकडे निहित असण्याचे चालू राहील अशा प्रकल्पांना सामाजिक प्रभाव निर्धारणापासून सूट दिली असल्यामुळे सामाजिक प्रभाव निर्धारण करण्यात आलेले नाही. त्यामुळे त्याचा सारांश प्रकाशित करण्याचा प्रश्न उद्भवत नाही.

**अनुसूची - ५**

**नियुक्त केलेल्या प्रशासकाचा तपशील :** लागू नाही

**डॉ. मित्ताली सेठी** (भा.प्र.से.),
जिल्हाधिकारी, नंदुरबार.

नंदुरबार, २८ नोव्हेंबर २०२५.

---

## जिल्हाधिकारी यांजकडून

### शुद्धीपत्रक

**जिल्हा जळगाव**

क्रमांक जमीन-१/कावि/३३/१६/२८०२७०६/२०२६/शुद्धीपत्रक.--- ज्याअर्थी, महसूल व वन विभाग क्रमांक टीएलसी-१०७६/६३९२३/म-६, दिनांक १ जुलै १९७६ अन्वये महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियम, १९६६ (सन १९६६ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ४१) यांच्या कलम ४, पोट-कलम *(१)* चे परंतुकाखाली राज्य शासनास असलेल्या ज्या शक्ती मला प्रत्यायोजित करण्यात आल्या आहेत, त्याचा वापर करून उक्त कलम ४ च्या पोट-कलम *(४)* द्वारे आवश्यक असल्याप्रमाणे जळगाव जिल्ह्याच्या जामनेर तालुक्यातील लोंढरी तांडा या गावाचे महसुली गावात रूपांतर करणेबाबतची अंतिम अधिसूचना महाराष्ट्र शासन राजपत्र, भाग एक, नाशिक विभागीय पुरवणी, १० ऑक्टोबर ते १६ ऑक्टोबर, २०२४ रोजी पृष्ठ २० वर प्रसिद्ध करण्यात आलेली आहे.

आणि ज्याअर्थी, तहसीलदार, जामनेर यांनी त्यांचेकडील पत्र क्रमांक जमाबंदी-१/कावि/५१७/२०२५, दिनांक २ जानेवारी २०२६ नुसार सदर अधिसूचनेमधील गट नंबर २८१ कमी करण्याचा दुरुस्तीचा प्रस्ताव सादर केलेला आहे.

त्यानुसार, जळगाव जिल्ह्याच्या जामनेर तालुक्यातील लोंढरी तांडा या गावाचे महसुली गावात रूपांतर करणेबाबतच्या दिनांक १० ऑक्टोबर ते १६ ऑक्टोबर, २०२४ या अधिसूचनेमध्ये खालीलप्रमाणे दुरुस्ती करण्यात येत आहे.

**दुरुस्ती**

| **या ऐवजी** | **असे वाचावे** |
|---|---|
| लोंढरी तांडा, तालुका जामनेर या गावात प्रसिद्ध राजपत्रानुसार समाविष्ट असणारा गट नंबर २८१ कमी करण्यात येत आहे. | मौजे लोंढरी बु. ग्रामपंचायत तालुकामध्ये गट नंबर २८१ समाविष्ट करण्यात येत आहे. |

**रोहन घुगे,**
जिल्हाधिकारी, जळगाव.

जळगाव, ९ जानेवारी २०२६.

---

## BY PRINCIPAL DISTRICT AND SESSIONS JUDGE

### Order

**Read** : (1) This Office Letter No. B-8/7422/2025, dated 14th November 2025 submitted to the Hon'ble High Court, Bombay sending there with a list of Holidays and Vacations for the year 2026.

(2) Hon'ble High Court Letter No. X(Gen)-0202/2025/2358, dated 9th December 2025.

No. B-8/Admin/8038/2025.– In view of directions issued by the Hon'ble High Court, Bombay *vide* letter No. X(Gen.)-0202/2025/2358, dated 9th December 2025 the following list of Holidays and Vacations declared for all the Courts and their offices in Judicial District, Dhule for the Calendar year 2026 is hereby published.

**LIST OF HOLIDAYS AND VACATIONS FOR THE CALENDER YEAR 2026**

| Sr. No. | Name of the Holidays | Date on which holiday falls | Day | Remarks |
|---|---|---|---|---|
| 1 | 2 | 3 | 4 | 5 |
| 1 | Makar Sankrant | 14/01/2026 | Wednesday | Local |
| 2 | Republic Day | 26/01/2026 | Monday | Common |
| 3 | Chhatrapati Shivaji Maharaj Jayanti | 19/02/2026 | Thursday | Common |
| 4 | Holi (2nd Day) | 3/03/2026 | Tuesday | Common |
| 5 | Gudhi Padwa | 19/03/2026 | Thursday | Common |
| 6 | Ramzan Eid | 21/03/2026 | Saturday | Common |
| 7 | Ram Navami | 26/03/2026 | Thursday | Common |
| 8 | Good Friday | 3/04/2026 | Friday | Local |
| 9 | Dr. Babasaheb Ambedkar Jayanti | 14/04/2026 | Tuesday | Common |
| 10 | Maharashtra Day | 01/05/2026 | Friday | Common |
| 11 | Bakari Eid | 27/05/2026 | Wednesday | Common |
| 12 | Moharrum | 26/06/2026 | Friday | Common |
| 13 | Independance Day | 15/08/2026 | Saturday | Common |
| 14 | Eid-E-Milad | 26/08/2026 | Wednesday | Common |
| 15 | Gokul Ashtami / Gopalkala | 05/09/2026 | Saturday | Common |
| 16 | Pola | 10/09/2026 | Thursday | Local |
| 17 | Shree Ganesh Chaturthi | 14/09/2026 | Monday | Common |

**LIST OF HOLIDAYS AND VACATIONS FOR THE CALENDER YEAR 2026** – *contd.*

| Sr. No. | Name of the Holidays | Date on which holiday falls | Day | Remarks |
|---|---|---|---|---|
| 1 | 2 | 3 | 4 | 5 |
| 18 | Gauri Pujan | 18/09/2026 | Friday | Common |
| 19 | Anant Chaturdashi | 25/09/2026 | Friday | Common |
| 20 | Mahatma Gandhi Jayanti | 02/10/2026 | Friday | Common |
| 21 | Dasara | 20/10/2026 | Tuesday | Common |
| 22 | Diwali (Additional) | 09/11/2026 | Monday | Local |
| 23 | Diwali (Balipratipada) | 10/11/2026 | Tuesday | Common |
| 24 | Diwali (Additional) | 11/11/2026 | Wednesday | Local |
| 25 | Diwali (Additional) | 12/11/2026 | Thursday | Local |
| 26 | Diwali (Additional) | 13/11/2026 | Friday | Local |
| 27 | Christmas | 25/12/2026 | Friday | Local |

**Notes :**

1. The following holiday is not notified as holiday fall on Sunday during the year 2026.

| | | | |
|---|---|---|---|
| 1 | Mahashivratri | 15/02/2026 | Sunday |
| 2 | Diwali (Laxmi Pujan) | 08/11/2026 | Sunday |

2. All Civil Courts in the Judicial District, Dhule will remain closed on account of Summer Vacation from 11th May 2026 to 7th June 2026 (both days inclusive) and Winter Vacation from 25th December 2026 to 31st December 2026 (both days inclusive).

3. All Criminal Courts and their offices in the Dhule District will function during the above period of Summer and Winter Vacation except Sundays, 2nd and 4th Saturday, as well as other Public Holidays.

4. All the Courts and Offices in Dhule District shall remain closed on all 2nd and 4th Saturday and also on Sunday.

**MADHURI ANAND,**
Principal District and Sessions Judge,
Dhule.

Dhule, 10th December 2025.

---

## कुलसचिव यांजकडून

## महात्मा फुले कृषी विद्यापीठ, राहुरी

## अधिसूचना

क्रमांक विद्याशाखा/म.लो.ह.अ/विद्या/४९२५/२०२५.--- ज्याअर्थी, महाराष्ट्र लोकसेवा हक्क अधिनियम, २०१५ याच्या कलम ३ *(१)* अन्वये प्राप्त अधिकारानुसार मी, राजेंद्रकुमार पाटील, कुलसचिव, महात्मा फुले कृषी विद्यापीठ, राहुरी याद्वारे उक्त अधिनियमाच्या प्रयोजनार्थ महात्मा फुले कृषी विद्यापीठ, राहुरी यांच्या अधिनस्त कुलसचिव कार्यालय विद्या शाखेमार्फत नागरिकांना पुरविण्यात येत असलेल्या लोकसेवा, नियम कालमर्यादा, पदनिर्देशित अधिकारी, प्रथम व द्वितीय अपिलीय अधिकारी या बाबी खालील परिशिष्टामध्ये नमूद केल्याप्रमाणे अधिसूचित करीत आहे.

यापूर्वी दिनांक २६ जून २०२५ रोजी महाराष्ट्र शासन राजपत्र, भाग एक-नाशिक विभागीय पुरवणी, गुरुवार ते बुधवार, जून २६ ते जुलै २, २०२५ मध्ये महाराष्ट्र लोकसेवा हक्क अधिनियम, २०१५ यांच्या कलम ३ *(१)* मधील तरतुदीनुसार प्रसिद्ध करण्यात आलेली अधिसूचना प्रशासकीय कारणास्तव रद्द करण्यात येत आहे.

### परिशिष्ट

### महाराष्ट्र लोकसेवा हक्क अधिनियम, २०१५

### लोकसेवा हक्क अध्यादेशांतर्गत विद्यार्थ्यांना पुरविण्यात येणाऱ्या सेवांची यादी

| अ. क्र. | अधिसूचित लोकसेवेचा तपशील | लोकसेवा पुरविण्यासाठी विहीत केलेली कालमर्यादा (दिवस) | लोकसेवा पुरविण्यासाठी निर्धारित शुल्क (आवश्यकतेनुसार निर्धारित शुल्कामध्ये संभाव्य बदल होऊ शकतो) | पदनिर्देशित अधिकाऱ्यांचे पदनाम | प्रथम अपिलीय अधिकाऱ्यांचे पदनाम | द्वितीय अपिलीय अधिकाऱ्यांचे पदनाम |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ |
| १ | दुबार पदवी / पदव्युत्तर प्रमाणपत्र | ३० दिवस | रु. २०००/- | सहायक कुलसचिव (विद्या) | उपकुलसचिव (विद्या) | कुलसचिव |
| २ | दुबार पदवी / पदव्युत्तर गुणपत्रक | ४५ दिवस | रु. ५००/- | सहायक कुलसचिव (विद्या) | उपकुलसचिव (विद्या) | कुलसचिव |
| ३ | दुबार तात्पुरते उत्तीर्ण प्रमाणपत्र | ७ दिवस | -- | सहायक कुलसचिव (विद्या) | उपकुलसचिव (विद्या) | कुलसचिव |
| ४ | दुबार कृषी तंत्रपदविका (२ वर्ष मराठी माध्यम अभ्यासक्रम) प्रमाणपत्र | ३० दिवस | रु. ५००/- | सहायक कुलसचिव (विद्या) | उपकुलसचिव (विद्या) | कुलसचिव |
| ५ | दुबार कृषी तंत्रज्ञान पदविका (३ वर्ष अर्ध ) / कृषी तंत्रनिकेतन (३ वर्ष पूर्ण इंग्रजी माध्यम अभ्यासक्रम) प्रमाणपत्र | ३० दिवस | रु. ५००/- | सहायक कुलसचिव (विद्या) | उपकुलसचिव (विद्या) | कुलसचिव |
| ६ | दुबार कृषी तंत्र पदविका (२ वर्ष मराठी माध्यम अभ्यासक्रम) गुणपत्रक | ३० दिवस | रु. ५००/- | सहायक कुलसचिव (विद्या) | उपकुलसचिव (विद्या) | कुलसचिव |
| ७ | दुबार कृषी तंत्रज्ञान पदविका (३ वर्ष अर्ध) / कृषी तंत्रनिकेतन (३ वर्ष पूर्ण) इंग्रजी माध्यम अभ्यासक्रम) गुणपत्रक | ३० दिवस | रु. ५००/- | सहायक कुलसचिव (विद्या) | उपकुलसचिव (विद्या) | कुलसचिव |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| ८ | दुबार माळी प्रशिक्षण प्रमाणपत्र | ३० दिवस | रु. ५००/- | सहायक कुलसचिव (विद्या) | उपकुलसचिव (विद्या) | कुलसचिव |
| ९ | दुबार स्थलांतर प्रमाणपत्र | ३० दिवस | -- | सहायक कुलसचिव (विद्या) | उपकुलसचिव (विद्या) | कुलसचिव |

**राजेंद्रकुमार पाटील,**
कुलसचिव,
महात्मा फुले कृषी विद्यापीठ, राहुरी,
तालुका राहुरी, जिल्हा अहिल्यानगर.

राहुरी, २९ डिसेंबर २०२५.

---

## BY REGISTRAR

### MAHATMA PHULE KRISHI VIDYAPEETH, RAHURI

### Notification

No. Academic Department/Ma.Lo.Ha.Ay/Academy/4925/2025.-In pursuance of the powers vested under Section 3 *(1)* of the Maharashtra Right to Public Service Act, 2015, I, Rajendrakumar Patil, Registrar, Mahatma Phule Krishi Vidyapeeth, Rahuri hereby notify the public services provided to the citizens through the office of the Registrar Academic Branch of Mahatma Phule Krishi Vidyapeeth, Rahuri, for the purpose of the said Act rules, time limits Designated Officers, First and Second Appellate officers as mentioned in the following appendix.

The notification previously published in the Maharashtra Government Gazette, Part One, Nashik Divisional Supplement, dated June 26, 2025 Thursday to Wednesday, June 26 to July 2, 2025, under the provisions of Section 3 *(1)* the Maharashtra Right Service Act 2015, is being cancelled for administrative reason.

### Schedule

### Maharashtra Right to Public Services Act, 2015

### List of services provided to students under the Right to Public Service Act

| Sr. No. | Public Service | Time Limit for providing service (Days) | Amount (The prescribed fee may be subject to change as necessary) | Designated Officer | First Appellate Officer Name | Second Appellate Officer Name |
|---|---|---|---|---|---|---|
| 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 |
| 1 | Duplicate UG/PG Degree Certificate | 30 Days | Rs. 2000/- | Assistant Registrar (ACD) | Deputy Registrar (ACD) | Registrar |
| 2 | Duplicate UG/PG Transcript (Mark Sheet) | 45 Days | Rs. 500/- | Assistant Registrar (ACD) | Deputy Registrar (ACD) | Registrar |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| 3 | Duplicate Provisional Passing Certificate | 7 Days | -- | Assistant Registrar (ACD) | Deputy Registrar (ACD) | Registrar |
| 4 | Duplicate Agril. Technical Diploma (2 year Marathi Medium) Certificate | 30 Days | Rs. 500/- | Assistant Registrar (ACD) | Deputy Registrar (ACD) | Registrar |
| 5 | Duplicate Agril. Technical Diploma (3 Year Semi English)/ Agril. Polytechnic (3 Year English Medium) Certificate | 30 Days | Rs. 500/- | Assistant Registrar (ACD) | Deputy Registrar (ACD) | Registrar |
| 6 | Duplicate Agril. Technical Diploma (2 year Marathi Medium) Mark Sheet | 30 Days | Rs. 500/- | Assistant Registrar (ACD) | Deputy Registrar (ACD) | Registrar |
| 7 | Duplicate Agril. Technology (3 Year Semi English)/ Agril. Polytechnic (3 Year English Medium) Mark Sheet | 30 Days | Rs. 500/- | Assistant Registrar (ACD) | Deputy Registrar (ACD) | Registrar |
| 8 | Duplicate Mali Training Certificate | 30 Days | Rs. 500/- | Assistant Registrar (ACD) | Deputy Registrar (ACD) | Registrar |
| 9 | Duplicate Migration Certificate | 30 Days | -- | Assistant Registrar (ACD) | Deputy Registrar (ACD) | Registrar |

**RAJENDRAKUMAR PATIL,**
Registrar,
MPKV, Rahuri,
taluka Rahuri
district Ahilyanagar.

Rahuri, 29th December 2025.

ON BEHALF OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, PRINTED AND PUBLISHED BY DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE, PRINTED AT YERAWADA PRISON PRESS, PRISON COMPOUND, YERAWADA, PUNE-411 006 AND PUBLISHED AT DIRECTORATE OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATIONS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI – 400 004.

EDITOR : DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE.